# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 06.03.2013 (का.प.क्र.29) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

**बुधवार दिनांक 06.03.2013 (का.प.क्र.29) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 12.35 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

**01.** स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
**02.** स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
**03.** स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
**04.** स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
**05.** स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
**06.** स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
**07.** स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
**08.** स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
**09.** स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
**10.** स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**<u>चर्चा :</u>**

**श्री.गिरजाराम हाळनोर:** वर्तमानपत्रामध्ये पाणीपुरठयासंदर्भात दररोज वेगवेगळया बातम्या प्रकाशित होत आहे. शहरामध्ये ज्या विहीरी आहेत त्यांचा प्रशासनाने सर्वे केलेला नाही. माझ्या वार्डातील प्रतापनगर, म्हाडा कॉलनी येथील बोअरला चांगल्या स्वरूपात पाणी आहे. बोअरींग बाबत आगामी अर्थसंकल्पामध्ये तरतुद केलेली नाही. दुष्काळस्थिती असल्याने बोअरींगकरीता तरतुद करण्यात यावी. विशेष निधी पाणीपुरवठयासाठी ठेवण्यात यावा. आमदार खासदार निधीतुन बोअरींग घेण्यास प्रशासनाकडुन तात्काळ मंजूरी देण्यात यावी.

**श्री.बाळासाहेब मुंडे :** वार्ड इ कार्यालया अंतर्गत टँकरचे 150 (ट्रिप) अर्ज प्रलंबित आहे. ज्यांनी रकमेची भरणा केलेली आहे त्यांनाही टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात नाही. वार्डात खाजगी व्यक्ती दुषित पाणी 20 रूपये ड्रम याप्रमाणे नागरीकांना विकले जात आहे. त्यामुळे नागरीकांना नाईलाजास्तव सदर पाणी विकत घ्यावे लागते. त्यामुळे वार्डातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. सदरील खाजगी व्यक्तींवर तात्काळ प्रशासनाने कारवाई करावी. जिल्हा परिषदने एक हजार टँकर लावलेले आहे. महानगरपालिका प्रशासनाने फक्त 10 टँकर जास्तीचे लावलेले आहे. गुंठेवारी भागात पाण्याचा प्रश्न गंभिर आहे. प्रत्येक

बैठकीत सदरील प्रश्नावर चर्चा केली जात आहे. परंतु कार्यवाही काहीही होत नाही.

**श्री.समीर राजुरकर** :जिल्हा परिषदने डिपीडीसीमध्ये 500 टँकरचा प्रस्ताव ठेवला होता याबाबतीत महापालिका प्रशासनाने राज्य शासनाकडे प्रस्ताव ठेवलेला आहे का?

**मा.सभापती** :फिलींग स्टेशन किती आहे तेथुन रोज किती टँकर भरले जातात.

**कार्य.अभियंता (पा.पू.)**:तीन फिलींग स्टेशन आहे. 51 टँकर सध्या चालू आहे. नागरीकांची दिवसेंदिवस टँकरची मागणी वाढत आहे. जिल्हा प्रशासनाची विनंती आलेली आहे. ग्रामीण भागात टँकरसाठी मागणी केलेली आहे. यासाठी 25 लाख रूपये देण्यात येणार असुन यासाठी चार ठिकाणी फिलींग स्टेशन चालू करणार आहे. एन-7, फारोळा, नक्षत्रवाडी, आणि ढोरकीन, ढोरकीन आणि फारोळा येथील फिलींग स्टेशनचा फायदा ग्रामीण भागासाठी होणार आहे. टँकरचे दर आणि प्रत्यक्ष येणारा खर्च यात तफावत आहे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :पैशाअभावी नागरीकांना पाणी देण्यात येत नाही का?

**श्री.नारायण कुचे** :महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. नागरीकांना पाणी पिण्यासाठी नाही. पाणीपुरवठा पैशाअभावी करण्यात येत नाही हे बरोबर नाही.

**श्री.रेणुकादास वैद्य** :स.सदस्यांच्या तीव्र भावना आहे. नागरीकांना पाण्याची आवश्यकता आहे. पिण्याचे पाणी देण्यात यावे. लोकप्रतिनिधी म्हणुन सभागृहात विषय मांडला जातो. सेवा,जबाबदारी म्हणुन टँकर पुरविणे आवश्यक आहे. दर वाढविण्यासंदर्भांत मा.सर्वसाधारण सभेमध्ये विषय ठेवण्यात यावा सभेमध्ये निर्णय घेण्यात येईल.

**कार्य.अभियंता (पा.पू.)**:दरवाढी संदर्भांत मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवला जाईल त्या आधारावर आज टँकर सुरू करावयाचे का?

**श्री. बाळासाहेब मुंडे** :ज्या नागरीकांकडुन रक्कम भरून घेण्यात आलेली आहे त्यांना आज रोजी टँकर देण्यात यावे. प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात यावे त्यांना जुन्या दरानेच टँकर देण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :मा.सर्वसाधारण सभेच्या जो काही निर्णय होईल त्याच्या अधिन प्रशासनाने आज रोजी कार्यवाही करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर**:पैशासाठी प्रशासनाने नागरीकांना पाण्यासाठी वेठीस धरू नये.

**श्री.रेणुकादास वैद्य** : प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात यावे त्यांना जुन्या दरानेच टँकर देण्यात यावे. मा.सर्वसाधारण सभेने दर वाढविल्यास तो दर आकारण्यात यावा.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :एक अबोव्ह टेंडर रद्द केले तर टँकरचा पुर्ण उन्हाळा त्यात निघेल.

**श्री.नारायण कुचे** :बजेटमधील पाच लाख रूपये वळती करून त्यात लावण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सभागृह स.सदस्यांच्या भुमिकेशी सहमत आहे.

**श्री.नारायण कुचे** :गुंठेवारी वसाहतींमध्ये पाणी नाही.

**श्री.रेणुकादास वैद्य** :ज्या दराने पैसे भरून घेतलेले आहे त्याच दाराने चालु करण्यात यावे. मा.सर्वसाधारण सभेने दर वाढविल्यास तो दर नागरीकांकडुन आकारण्यात यावा. प्रशासनाची जबाबदारी आहे पाणी दिले पाहिजे.

**कार्य.अभियंता(पा.पू.)** :स.सदस्य यांनी विचारणा केल्यानुसार शासनाकडे प्रस्ताव दिला का?

**श्री.नारायण कुचे** : पाणी दिले पाहिजे. शासन पैसे देईल तेव्हा जनतेला पाणी देऊ. हे म्हणने योग्य नाही. शासनाने पैसे दिले नाही तर?

**मा.सभापती** :शब्दाचा वापर योग्य पध्दतीने करण्यात यावा. सभागृह निर्णय घेईल.

**श्री.समीर राजुरकर** :150 प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात यावे त्यांना जुन्या दरानेच टँकर देण्यात यावे. मा.सर्वसाधारण सभेने दर वाढविल्यास तो दर आकारण्यात यावा.

**श्री.नारायण कुचे** :गुंठेवारीच्या 118 वसाहतींना पाणी देण्यात यावे.

**श्री.समीर राजुरकर** :तात्काळ टँकर सुरू करण्यात यावे. मा.सर्वसाधारण सभा दरवाढीचा निर्णय घेईल.

**मा.सभापती** : 150 प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात यावे. नागरीकांकडुन आज रोजी पैशाची भरणा प्रशासनाने करून घेतलेली आहे त्यांना त्यांच दरानेच टँकर देण्यात यावे. मा.सर्वसाधारण सभेने दर वाढविल्यास तो दर आकारण्यात यावा. तसेच नाल्याच्या बाजुच्या विहीरींचे पाणी पिण्यासाठी न वापरता इतर गोष्टींसाठी वापरण्यात यावा. याबाबतीत प्रशासनाने योग्य नियोजन करण्यात यावे. शहरात नागरीकांना दूषित पाणीपूरवठा करणाऱ्याविरूध्द कडक कारवाई करण्यात यावी.

**विषय क्र. 176 :** (विषय क्र. 171 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/02/2013 (का.प.क्र.28) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**
टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :विषय क्रमांक 176 स्थगीत.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 177 :** (विषय क्र. 172 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/02/2013 (का.प.क्र.28) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7),03/08/2012 (का.प.क्र.8),10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.** टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :विषय क्रमांक 177 स्थगीत.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 178 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.गारखेडा येथील नुपूर अपार्टमेंट लगत/शेजारील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील व्यापारी संकुलामधील दुकान क्र.2 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.ॲड.राजेंद्र पी. मुगदिया यांनी केलेल्या मागणी व विनंतीनुसार दुकान संबंधीतास देणेबाबत मा.स्थायी समिती विषय क्र.111 प्रमाणे रक्कम रू.3000/- प्रतिमाह भाडे आकारून इतर नेहमीच्या अटी / शर्तीस अधिन राहून प्रथम तीन वर्षाचे कालावधीकरीता दुकान भाडे तत्वावर देण्यास मान्यता झाली आहे. तद्नंतर संबंधीताने मा.आयुक्त यांना पत्र देऊन सदर दुकान आतील बाजूस असून तेथे व्यापार करण्याचा आमचा उद्देश नाही, आम्ही महानगरपालिकेच्या

ॲडव्होकेट पॅनलवर कायदेशीर सल्लागार म्हणुन अल्प मोबदल्यात काम करीत आहोत. तसेच महानगरपालिकाचे अनेक किचकट व मोठमोठ्या महत्वाच्या प्रकरणात महानगरपालिकेची भक्कमपणे बाजु मांडुन अनेक प्रकरणांचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लावण्याचा कसोशीन प्रयत्न केलेला आहे. या सर्व बाबींचा आपण विचार करून आमच्या गाळयाचे भाडे रू.3000/- प्रतिमाह ठरवलेला आहे. त्यात आपण 50% सुट द्यावी व प्रतिमाह रू.3000/- ऐवजी रू.1500/- भाडे घ्यावे, अशी विनंती करून भाडे कमी करण्याची मागणी केली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे.

करिता सदर दुकाना करीता वरीलप्रमाणे प्रतिमाह रू.1500/- भाडे निश्चीत करून नेहमीच्या इतर अटी / शर्तीस अधिन राहून प्रथम तीन वर्षाचे कालावधी करीता दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा.सभापती :विषय क्रमांक 178 मंजूर.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.गारखेडा येथील नुपूर अपार्टमेंट लगत/शेजारील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील व्यापारी संकुलामधील दुकान क्र.2 अर्जदार श्री.ॲड.राजेंद्र पी. मुगदिया यांना प्रतिमाह रू.1500/- भाडे निश्चीत करून नेहमीच्या इतर अटी / शर्तीस अधिन राहून प्रथम तीन वर्षाचे कालावधी करीता दुकान भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :विषय क्रमांक 179.**

**विषय क्र. 179 :**

मनपा सेवेतून काढुन टाकण्याच्या दिनांक 28/08/2012 च्या आदेशाविरूध्द 24 सफाई मजुरांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे. सेवेतून काढुन टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

वॉर्ड अ- दिनेश किसन जाधव, ग्यान प्रकाश हरणे, मंगलाबाई सुरेश तुपे, रेखा बाबुराव जगताप, रविंद्र किसन साळवे, विठ्ठल भास्कर मोरे, वॉर्ड क - परशुराम गंगाराम चव्हाण, अंबादास मुजमुळे, हंसराज विश्वनाथ मिसाळ, संजय श्रीपत हिवराळे, प्रकाशीबाई भिमसिंग रिडलॉन, वॉर्ड-ड खेमचंद राजाराम वाघमारे, प्रभाकर बाबुराव चांदणे, सुधाकर सांडु नावकर, सिध्दार्थ निवृत्ती काळसरे, रवि गणपत बारे, कैलास तुळशिराम मुजमुळे, रूपचंद धरमचंद बनकर, गंगाधर विश्वनाथ चांदणे, रामदास हिवराळे, संगीताबाई ठोकळ, वॉर्ड ई- गणेश बाबुराव तुपे, सर्जेराव गोरख कांबळे, ज्ञानेश्वर बन्सी मिसाळ.

**संवाद :**

**श्री.रेणुकादास वैद्य** :24 सफाई मजुरांना सेवेतून काढण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता सभागृहाने निर्णय घेत असतांना हि बाब लक्षात घ्यावी की, सदरील कर्मचारी हे चतुर्थ श्रेणी वर्गातील आहे. गरीब कुटूंबातील कर्मचारी आहेत कर्मचाऱ्यांकडुन चुका झाल्यामुळे प्रशासनाने कारवाई केलेली आहे. कारवाई करणे प्रशासनाला आवश्यक होते. सदरील कर्मचाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई व्हावी. शास्ती लावण्यात यावी. परंतु सेवेतुन काढुन टाकणे हे योग्य नाही. संबधीताचे अपिल मान्य करण्यात यावे. कायमस्वरूपी सेवेत ठेवण्याचा निर्णय घेण्यात यावा. तसेच प्रशासनाला आदेशीत करण्यात यावे की, योग्य प्रकारची सोम्य शिक्षा देण्यात यावी. जेणेकरून त्यांच्या चुका लक्षात येतील. एकदम बडतर्फ करण्याचा निर्णय योग्य नाही. सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**श्री.समीर राजुरकर** :अपिल स्थायी समितीकडे आलेले आहे. तत्कालिन आयुक्तांनी बडतर्फीची कारवाई करण्यात आली होती. गरीब घरचे वर्ग चारचे कर्मचारी आहेत त्यांचा सहानुभूतिपुर्वक विचार करण्यात यावा. कचरा सफाई, पाणीपुरवठा यासंदर्भात शहरास वेठीस धरण्याचा जे कर्मचारी प्रयत्न करतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. अपिल मंजूर करत असतांना सदरील कर्मचाऱ्यांचे तीन वेतनवाढी कायमस्वरूपी बंद करण्यात याव्यात. कर्मचाऱ्यां मध्ये महानगरपालिकेमध्ये असा पायंडा पडता कामा नये की, चुक केल्यास प्रशासन शिक्षा करतो परंतु सभागृह माफी देतो. अशा प्रकारचा पायंडा पडता कामा नये. जे आरोप लागलेले आहे त्यांना शिक्षा देवुन कामावर घेण्यात यावे.

**श्री.विजेंद्र जाधव** :या कर्मचाऱ्यांनी उपोषण केले होते. चतुर्थ श्रेणी कर्मचारी गरीब परिस्थितीतील आहे. या कर्मचाऱ्यांचे दोन ते तीन वेतनवाढ बंद करून कामावर घेण्यात यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर**:चतुर्थश्रेणी कर्मचारी आहे गरीब आहे त्यांचा चरितार्थ चालला पाहिजे यात दुमत नाही. कर्मचाऱ्यांमध्ये हा मॅसेज जाता कामा नये काहीही चुका केल्यातरी सभागृह माफ करतो. प्रशासन काहीच करू शकत नाही. त्यामुळे सदरील कर्मचाऱ्यांना सौम्य प्रकारची शिक्षा देऊन दोन ते तीन वेतनवाढ बंद करण्यात यावी. याच प्रकारचा 1124 भरती प्रकरणातील कर्मचाऱ्यांचा प्रस्तावाचा निर्णय सभागृहाने घेतला होता. परंतु प्रशासनाने कलम 491 खाली तो प्रस्ताव विखंडीत करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यात आला होता. ते कोणत्या अधिकाराखाली पाठविण्यात आले. अशी विचारणा शासनाने केलेली आहे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासन करणार आहे की नाही. दिनांक 27.02.2013 रोजी शासनाने जे पत्र पाठविले आहे त्याचा खुलासा करण्यात यावा तसेच निर्णयाची अंमलबजावणी करणार आहे का नाही खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :ठराव क्रमांक 27,35,36,42,46,44 विखंडीत करण्याकरीता प्रशासनाने शासनाकडे पाठविण्यात आला होता. 451 खाली ॲक्शन घेता येते का म्हणन शासनाने विचारणा केलेली आहे. आज चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा अपिलचा विषय सभागृहापुढे आलेला आहे. कलम 451 वाचुन दाखविण्यात यावी.

**नगर सचिव तथा वि.स.** :मु.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे 451 विवक्षित प्रकरणांमध्ये महानगरपालिकेचा किंवा इतर प्राधिकाऱ्यांचा कोणताही ठराव किंवा आदेश निलंबित किंवा विखंडित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार:-
1)महानगरपालिकेच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वयन केल्याने किंवा महानगरपालिकेकडून किंवा अशा प्राधिकाऱ्याकडून किंवा तिच्या किंवा त्यांच्या तीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याची शक्यता आहे किंवा जी करण्यात येत असेल ती केल्याने हा अधिनियम किंवा त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याद्वारे किंवा तदन्वये देण्यात आलेल्या

अधिकाऱ्याच्या विरूध्द किंवा मर्यादेबाहेर आहे किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे किंवा लोकांस किंवा व्यक्तींच्या कोणत्याही वर्गास किंवा गटास इजा किंवा त्रास होण्याचा संभव आहे किंवा लोकहिताविरूध्द नगरपालिका निधीचा दुरूपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा संभव आहे (किंवा ते महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या अथवा व्यापक लोकहिताच्या विरूध्द आहे) असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास लेखी आदेशाद्वारे, अशा ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वयन, त्यामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीसाठी किंवा मुदतींसाठी, निलंबित करता येईल किंवा अशी कोणतीही कृती करण्यास मनाई करता येईल अशा आदेशाची एक प्रत, राज्य शासनाने महानगरपालिकेस व आयुक्तास व परिवहन व्यवस्थापकास ताबडतोब पाठविली पाहिजे.

2)उपरोक्त प्रमाणे आदेशाची प्रत मिळाल्यावर, महानगरपालिकेस किंवा आयुक्तांस किंवा परिवहन व्यवस्थापकास, त्यास योग्य वाटेल तर, उक्त आदेशाविरूध्द राज्य शासनाकडे अभिवेदन करता येईल.

3)राज्य शासनास, महानगरपालिकेकडून किंवा आयुक्ताकडून किंवा परिवहन व्यवस्थापकाकडून मिळालेले कोणतेही अभिवेदन विचारात घेतल्यानंतर व तीस दिवसांच्या मुदतीत असे कोणतेही अभिवेदन मिळाले नसेल त्याबाबतीत पोट-कलम (1) अन्वये त्याने दिलेला आदेश एक तर रद्द करता येईल , त्यात फेरबदल करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा प्रकरणाची सर्व परिस्थिती विचारात घेऊन, उक्त बाबीच्या संबंधात, त्याच्या मते जी न्याय्य किंवा इष्ट असेल अशी इतर कार्यवाही करता येईल, पोट कलम (1) अन्वये दिलेला कोणताही आदेश कायम करण्यात येईल त्याबाबतीत, राज्य शासनास, ज्याच्या संबंधात पोट-कलम (1) अन्वये निलंबन आदेश देण्यात आला होता असा महानगरपालिकेचा किंवा तिच्या प्राधिकाऱ्याचा ठराव किंवा आदेश हा विखंडित झाला असल्याचे मानण्यात येईल असा निर्देश देता येईल.

4)पोट-कलम (3) अन्वये, राज्य शासनाकडून कोणताही आदेश देण्यात येईल त्याबाबतीत, अशा आदेशाचे पालन करणे हे, प्रत्येक पालिका सदस्याचे व महानगरपालिकेचे व संबंधित इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याचे किंवा अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.)

श्री.समीर राजुरकर :दिनांक 27.02.2013चे शासनाचे पत्र आहे. त्यात नमुद केलेले आहे की, सदरील प्रकरण कोणत्या कारणामुळे Actionable ठरते. याविषयी प्रकरणाची नव्याने फेरतपासणी करून अहवाल सादर करण्यात यावा. घाईघडबडीमध्ये शासनाकडे अशा प्रकारचे विषय प्रशासनाने पाठवु नये. स्थायी समितीने नियमाला धरून निर्णय घेतलेला आहे. पुर्ण विचारांती निर्णय घेतलेला आहे. स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाची प्रशासनाने पुर्णपणे अभ्यास करून त्यानंतरच त्याची अंमलबजावणी करावी.

**मा.सभापती** :56(4) अपिल प्राधिकाऱ्याने दिलेले आदेश ताबडतोब अंमलात येईल व तो निर्णायक असेल.

**नगर सचिव तथा वि.स.** :तरतुद आहे अपिल प्राधिकाऱ्याने दिलेला आदेश ताबडतोब अंमलात येईल.

**मा.सभापती** :स्थायी समिती निर्णय घेते, परंतु प्रशासन 451 नुसार विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात येतो हे योग्य नाही. 24 कर्मचाऱ्यांना जो निर्णय घेण्यात येणार आहे त्याची अंमलबजावणी प्रशासन करणार आहे का?

**शहर अभियंता** :मागील स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे. त्यासंबधात शासनाने विचारणा केलेली आहे यासंदर्भात सभागृहात जी चर्चा झ ाालेली आहे ती योग्य आहे. 56 (4) नुसार प्रशासनातर्फे कारवाई करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर** : 56(4) प्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच सेवेत पुन्हा घेत असतांना आर्थीक गैरव्यवहार होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी तशा प्रकारच्या तक्रारी आल्यास स्थायी समितीतर्फे कारवाई करण्यात येईल.

**मा.सभापती** : अनेक दिवस सतत गैरहजर राहील्यामुळे बडतर्फ करण्यांत आलेल्या सफाई मजुरांपैकी प्रस्तावात दर्शविलेले 24 सफाई मजुरांचे तसेच कुणाल सातदिवे, मल्हारी साधु साळवे, (सफाई मजुर वॉर्ड-ड) आणि मनोज कैलास हिवराळे, (सफाई मजुर वॉर्ड-क) असे एकुण 27 सफाई मजुर यांनी स्थायी समितीकडे सादर केलेले अपिल मंजुर करण्यांत येते. तथापी अपीलार्थी कर्मचाऱ्यांच्या 3 वेतनवाढी कायमस्वरूपी गोठविण्यांत येत असून बडतर्फीचा कालावधी हा बडतर्फ कालावधी म्हणुन ग्राह्य धरण्यांत यावा. स्थायी समितीच्या निर्णयानुसार आस्थापना विभागाने तात्काळ सर्व अपीलार्थी कर्मचाऱ्यांना कामावर रूजू करून घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित करावी.

स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार यापुढे संबधीत कर्मचारी यांनी कामात निष्काळजीपणा, कर्तव्यात कसुर केल्यास तात्काळ त्यांचेवर कारवाई करण्यात येईल याबाबत संबधीत कर्मचारी यांना समज देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सफाई मजुरांना सतत गैरहजर राहिल्यामुळे मनपा सेवेतून काढुन टाकण्याच्या दिनांक 28/08/2012 च्या आदेशाविरूध्द, स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलानुसार वॉर्ड अ -दिनेश किसन जाधव, ग्यान प्रकाश हरणे, मंगलाबाई सुरेश तुपे, रेखा बाबुराव जगताप, रविंद्र किसन साळवे, विठ्ठल भास्कर मोरे, वॉर्ड क -परशुराम गंगाराम चव्हाण, अंबादास मुजमुळे, हंसराज विश्वनाथ मिसाळ, संजय श्रीपत हिवराळे, प्रकाशीबाई भिमसिंग रिडलॉन, मनोज कैलास हिवराळे, वॉर्ड ड -खेमचंद राजाराम वाघमारे, प्रभाकर बाबुराव चांदणे, सुधाकर सांडु नावकर, सिध्दार्थ निवृत्ती काळसरे, रवि गणपत बारे, कैलास तुळशिराम मुजमुळे, रूपचंद धरमचंद बनकर, गंगाधर विश्वनाथ चांदणे, रामदास हिवराळे, संगीताबाई ठोकळ, कुणाल सातदिवे, मल्हारी साधु साळवे, वॉर्ड ई -गणेश बाबुराव तुपे, सर्जेराव

गोरख कांबळे आणि ज्ञानेश्वर बन्सी मिसाळ अशा एकुण 27 सफाई मजुरांनी स्थायी समितीकडे सादर केलेले अपिल सर्वानुमते मंजुर करण्यांत येते.

अपिलार्थी कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे शास्ती लादण्याचा आदेश देण्यात येत आहे. अपीलार्थी कर्मचाऱ्यांच्या 03 वेतनवाढी कायमस्वरूपी गोठविण्यांत येत असून बडतर्फीचा कालावधी हा "बडतर्फ कालावधी" म्हणुन ग्राह्य धरण्यांत यावा. स्थायी समितीच्या निर्णयानुसार आस्थापना विभागाने तात्काळ सर्व अपीलार्थी कर्मचाऱ्यांना कामावर रूजू करून घ्यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री.समीर राजुरकर :विष्णुनगर येथील काही महिला व इतर नागरीक मनपाच्या प्रवेशद्वाराजवळ येवुन निदर्शने करीत आहे. वार्डात ड्रेनेजचे पाणी गेल्या नऊ महिन्यांपासून येत आहे. प्रशासनातर्फे खुलासा करण्यात यावा. स.सदस्या श्रीमती प्रिती तोतला यांना डेंग्युची लागण झाली होती का? याबाबीचाही खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता (श्री.कोल्हे):विष्णुनगर येथील नागरीकांशी समक्ष भेट घेतलेली आहे. लाईनचे काम सध्या सुरू आहे लाईनवर बोअर घेतल्यामुळे ही समस्या निर्माण झ ालेली आहे तात्काळ काम सुरू केलेले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :शहरात अनेक ठिकाणी अशा प्रकारची समस्या निर्माण होत आहे याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही सुरू करण्यात यावे.शहरात अनेक ठिकाणी वॉल लिकेजेस व इतर माध्यमातुन पाणी वाया जात आहे.याबाबत कारवाई करण्यात यावी व लिकेजेस 24 तासात दुरूस्त होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :नागरीकांमध्ये रिक्शा लावुन पाणी वाचविण्यासंदर्भात आवाहन करण्यात यावे.

मा.सभापती :लिकेजेस काढतांना योग्यरितीने लिकेजेस काढण्यात यावे. पाणी वाचविण्यासंदर्भात नागरीकांना आवाहन करण्यात यावे.

आरोग्य वै.अधिकारी :स.सदस्या श्रीमती प्रिती तोतला यांचा सात दिवसांपुर्वी निमोनिया या आजाराने आजारी असुन खाजगी रूग्णालयात उपचार घेत आहे म्हणुन दुरध्वनी आला होता. 4 तारखेला स.सदस्यांची भेट घेतलेली आहे सर्व रिपोर्ट तपासणी केलेले आहेत. घाटीमधील टेस्ट एनआव्ही, पुणे शासनमान्य संस्था यांचेकडे तपासणीकरीता रक्ताचे नमुने देण्यात आले होते. तेथील टेस्ट पॉझिटिव्ह आल्यास डेंग्यु आजार झाल्याचे निष्पन्न होते. अहवाल प्राप्त झालेला आहे. टेस्ट निगेटिव्ह आलेली असुन त्यांना ब्रॉनकॉईटिस्ट झाल्याचे निष्पन्न झालेले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर:औषधांची फवारणी योग्यरितीने होत नाही. 104 कर्मचाऱ्याकडे विभागाने कोणती जबाबदारी सोपविलेली आहे. औषध फवारणीचे नियोजन कसे आहे खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वै.अधिकारी :औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अर्बन मलेरीया स्किम चालविण्यात येते. 64 स्प्रे पंप आहेत. 12 फॉगिग मशिन कार्यरत आहेत. नाल्यामध्ये

स्प्रे करण्याकरीता 4 पंप आहेत. सिडकोमध्ये सहा कंत्राटदार असुन प्रत्येकी 7 कर्मचारी असुन 12 फॉगीग मशिन आहेत. ज्या ज्या वेळी तपासणी करण्यात येते त्यावेळेस संबधीत कर्मचारी यांचे रजिष्टरमध्ये नागरीकांच्या स्वाक्षरी आढळुन आलेल्या आहेत. आठवडयाचा ॲक्शन प्लॅन तयार असतो.

मा.सभापती :कर्मचारी योग्यपध्दतीने काम करीत नाही.

आरोग्य वै.अधिकारी :याबाबतीत सक्तीने तपासणी करण्यात येईल.

मा.सभापती :कर्मचारी यांनी योग्यरितीने नियोजन करून वार्डातील स.सदस्य यांचेशी संपर्क साधुन त्यांची स्वाक्षरी आणने गरजेचे आहे.

ॲक्शनपाईट 1 बाबत प्राणीसंग्रहालयातील घटनेबाबत खुलासा करण्यात यावा.

संचालक, प्रा.सं. :श्री.उजीवाल, दै.वे.कर्मचारी यांना मनपा सेवेतुन काढुन टाकलेले आहे.

मा.सभापती :लॉटरीवर एलबीटी आकारणीबाबत खुलासा करण्यात यावा.

प्र.आयुक्त :याबाबत मा.आयुक्त यांचेकडे संचिका पुटअप करण्यात आलेली आहे. झालेल्या निर्णयाची माहिती स्थायी समितीस देण्यात येईल.

मा.सभापती :मुद्दा क्रमांक 4 एकुण कचरा कुंडया किती व युजर चार्जस बाबत माहिती.

आरोग्य वै.अधिकारी :एकुण 1208 मनपा कर्मचारी कार्यरत आहेत. सिडकोमध्ये 327 बचतगटाचे कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच प्रत्येक झोनमध्ये 20 अतिरिक्त कंत्राटी लेबर देण्यात आलेले आहेत. मनपाच्या 28 वाहने कार्यरत आहेत तसेच खाजगी 18 वाहने चालु आहे घंटा गाडया 504 आहेत. हुक लोडरचे बिन्स 30 आहेत. स्किपलोडर प्रत्येक वार्डाला 10 दिलेले आहेत. 1000 लि.च्या 36 आहेत. 240 लि.च्या 997 बिन्स आहेत.

मा.सभापती :मोठया प्रमाणात मनुष्यबळ यंत्रसामुग्री असतांना सफाई व्यवस्थितरित्या होत नाही. यासाठी पुर्ण यंत्रणा जबाबदार होते.

आरोग्य वै.अधिकारी :रॅम्के असतांना 1100 लिटरचे कंन्टेनर घेण्यात आले होते. त्याला कॉम्पॅक्टर होते त्यामध्ये अनलोड होत होते. सध्या असलेले वाहनांनमध्ये हाताने कचरा भरावा लागतो. त्यामुळे कंन्टेनर उलटे करून ठेवलेले आहेत त्यामुळे त्याठिकाणी ओपन स्पॉट तयार झालेले आहे. त्यामुळेच कचरा साठलेला दिसत आहे.

श्री.समीर राजुरकर :1100 लिटरचे कंन्टेनर ठेवल्यामुळे तरी किमान कचरा रोडवर दिसत नाही. 1500 कर्मचाऱ्यांपैकी किती कर्मचारी रोज गैरहजर असतात.

आरोग्य वै.अधिकारी :24 कर्मचारी सतत गैरहजर असल्याने प्रशासनाने त्यांचेवर कारवाई केली होती.

श्री.समीर राजुरकर :किती दिवस कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणार याचा खुलासा होणे अपेक्षित आहे. महापालिका नागरीकांसाठी चालविण्यात येतात. दोन दोन वर्ष कामावर येणार नसेल व प्रशासन काहीच कारवाई करणार नसेल तर हे योग्य नाही. अशा कर्मचाऱ्यांचा पालिकेत बोलावुन आदरसत्कार केला पाहिजे व सांगीतले पाहिजे की आता तुमच्या सेवेची

महापालिकेस गरज नाही. काही कर्मचारी यांना काम होत नसेल वयोमानामुळे थकलेले असेल, काम करण्याची इच्छा नसेल अशा कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती घेण्यास सांगीतले पाहिजे त्यांचे जागेवर नव्या जोमाच्या व्यक्तींची भरती करून काम करून घेतले पाहिजे. नियमित गैरहजर असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या किती. नियमित अहवाल सादर केला जातो का?

आरोग्य वै.अधिकारी :नियमित गैरहजर असणाऱ्या कर्मचाऱ्याबाबतीत माहिती घेण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :सदरचा प्रश्न हा गंभिर आहे. एवढयामोठया प्रमाणावर कर्मचारी संख्या असल्यावरही कचऱ्याची सफाई योग्यरितीने होत नाही. प्रशासनाचे योग्य नियोजन नाही. या विषयामध्ये अतिशय गंभिरपणे काम करणे आवश्यक आहे. स्थायी समितीचे काही स.सदस्य मिळुन या सर्वांची एक बैठक आयोजित करण्यात यावी व त्यांना सफाई बाबत प्लॅन दिला गेला पाहिजे.

श्री.बाळासाहेब मुंडे :गैरहजर कर्मचाऱ्याबाबत अहवाल सादर केला जातो का?

मा.सभापती :नियमित गैरहजर कर्मचाऱ्याबाबतीतचा अहवाल सादर करण्यात यावा.

आरोग्य वै.अधिकारी :रात्रपाळीमध्ये एक एप्रिलपासून शहरात कचरा उचलण्याबाबतचे सूचना केलेल्या आहेत. लेबरच्या हजेरीसाठी बायोमॅट्रीक पध्दतीचा विचार करण्यात येत आहे. काही कर्मचारी हजेरी लावुन निघुन जातात.

श्री.समीर राजुरकर :गैरहजर कर्मचाऱ्याबाबत प्रशानाने कार्यवाही करावी. तसेच हजेरी लावुन लेबर काम न करता जातात असा खुलासा विभाग प्रमुख करीत असेल तर ही मुकसंमतीच आहे. सकाळी 6.30 वाजता येऊन सकाळी 7.30 वाजता परत जात असेलतर यापेक्षा गंभिर गोष्ट दुसरी नाही.

आरोग्य वै.अधिकारी:कर्मचाऱ्यांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

श्री.नारायण कुचे :सकाळ ते दुपारच्या सत्रात पहाणी केल्यास कर्मचारी गायब असल्याचे दिसुन येते.

श्री.समीर राजुरकर :प्रशासनाने सहा झोनमध्ये अचानक भेट देण्यात यावी तपासणी करण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर:विभाग प्रमुख, वॉर्ड अधिकारी, एस.आय, जवान, मजूर अशा प्रकारची यंत्रणा असुन सदरील यंत्रणा सदोष आहे. कुणाचा कुणाला ताळमेळ दिसुन येत नाही. आहे त्या कर्मचाऱ्यांमध्ये शहर सुंदर कसे होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. योग्यरितीने नियोजन करण्यात यावे. कुणाचे कुणावर वचक राहिलेला नाही. त्यामुळे अश्ी परिस्थीती उद्भवलेली आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत तसेच कामचुकार कर्मचारी यांच्यावर प्रशासनाने कडक कारवाई करण्यात यावी. वार्ड निहाय कर्मचाऱ्यांचा नावांसह अहवाल स्थायी समितीसमोर सादर करण्यात यावा. फवारणीचे औषधसाठा उपलब्ध आहेत का?

आरोग्य वै.अधिकारी :दोन महिने पुरेल एवढा साठा उपलब्ध आहे.

मा.सभापती :कैलासनगर येथील अतिक्रमण 48 तासात काढणेबाबत प्रशासनाने खुलासा केलेला आहे माहिती देण्यात यावी.

**उपआयुक्त(सिडको) :कारवाई करण्यात आलेली आहे.**

**"मालमत्ता कर आकारणी व कर वसुली" या विषयावर चर्चा करणे.**

**चर्चा :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :श्री.झनझन, विशेष वसुली अधिकारी यांनी चांगल्या प्रकारे वसुली करत आहे त्यांचे अभिनंदन करण्यात येते. मोठमोठया थकबाकीदारांकडुन वसुली झाली पाहिजे. मोबाईल टॉवरची वसुली चांगल्याप्रकारे करण्यात यावे. श्रीमती प्रियंता केसरकर, वसुली अधिकारी यांनी चांगल्याप्रकारे थकबाकी वसुलीचे काम करत आहे. ज्या भागात कमी प्रमाणात वसुली आहे त्या भागात संबधीत अधिकारी यांना नेमण्यात यावे जेणेकरून वसुली वाढेल यासाठी स.सदस्यांनी पाठींबा देणे गरजेचे आहे जेणेकरून कमी वसुली असलेल्या भागातुन चांगल्या प्रकारे टॅक्स वसुली होईल. त्यामुळे शहर विकासात भर पडेल. मा.आयुक्तांनी 9 अधिकाऱ्यांची टिम तयार केलेली आहे टिम चांगल्याप्रकारे वसुली करत आहे.**

**श्री.नारायण कुचे :पाणीपट्टी, मालमत्ता कर वसुली ही वर्षभर करण्यात यावी. तसेच यासाठी एकच अधिकाऱ्याकडे जबाबदारी सोपविण्यात यावी. नऊ अधिकाऱ्यांची जी टिम तयार करण्यात आलेली आहे त्या कोणत्या प्रभागात कार्यरत आहे. त्यांचेकडील जबाबदारी व इतर माहिती देण्यात यावी.**

**श्री.समीर राजुरकर :प्रशासनाने नविन टॅक्स लावणे संदर्भात अत्यंत गंभिरतेने विचार करणे गरजेचे आहे. वर्षभर टॅक्स ॲसेसमेंन्ट होणे गरजेचे आहे. मोठमोठे दुकानांना अतिशय कमी टॅक्स लावण्यात येतो हे योग्य नाही. कमर्शिअल टॅक्स लावतांना अतिशय पारदर्शीपणा असणे आवश्यक आहे. टॅक्स न भरणाऱ्या नागरीकांकडे विशेष लक्ष देण्यात यावे. जेणे करून जी तुट आहे ती भरुन निघेल. जे नागरीक टॅक्स अदा करतात त्यांचेवरच टॅक्समध्ये वाढ करून टॅक्स भरण्याबाबत दबाव टाकण्यात येतो. नविन टॅक्स ॲसेसमेंन्टचा दर महिन्याचा अहवाल सादर करण्यात यावा. 14 लाख लोकसंख्येच्या शहरात 3 लाख प्रापर्टीधारक असलेच पाहिजे व ते आहे. टॅक्स असेसमेंन्ट करतांना अतिशय पारदर्शीपणे टॅक्स लावला गेला पाहिजे. 1एप्रिल पासुन टिम तयार करून मा.आयुक्त,मा.महापौर, मा.सभापती यांना अहवाल दिला गेला पाहिजे.**

**श्री.नारायण कुचे :जीटीएलचे 2 लाख 34 हजार ग्राहक आहे. त्यातुलनेत महानगरपालिकेकडे मालमत्तांची नोंद होणे गरजेचे आहे. 1 एप्रिल पासुन टिम तयार करून नविन ॲसेसमेंट करण्यात यावी.**

**श्री.विजेंद्र जाधव :टॅक्सबाबतची डिमांड नागरीकांना वेळेवर मिळत नाही. यामुळेही वसुली कमी होण्याचे कारण आहे.**

**श्री.गिरजाराम हाळनोर:वर्षानुवर्ष टॅक्सची डिमांड जात नाही. वसुलीबाबत ओरड झाल्यास संबधीत नागरीकांस एकदाच पाच सहा वर्षाचा टॅक्स पे करण्यासंदर्भात सांगीतले जाते. हे योग्य नाही. वेळेवर डिमांड पोहचणे आवश्यक आहे. याबाबतीत प्रशासन गंभिर नाही. प्रबोधन प्रकाशन संस्था आहे ती समाज कार्य करीत आहे व्यवसाय म्हणुन संस्था चालवली जात नाही त्यासही आवाच्या सवा टॅक्स व दंड आकारण्यात आलेला आहे तो कमी करण्यात आलेला आहे तो कमी करण्यात यावा. शहरात असे अनेक**

उदाहरण आहे. काही प्रकरणे न्यायालयात जातात व मा.न्यायालय पुन्हा रिअसेसमेंट करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. नागीरकांच्या वसुलीसंदर्भांत काही समस्या असेल तर अधिकाऱ्यांनी त्यांचे दुरध्वनी चालू ठेवण्यात यावा. महानगरपालिकेची वसुली चांगल्या प्रकारे व्हावी ही लोकप्रतिनिधींचा मानस आहे परंतु लोकप्रतिनिधी नागरीकांच्या समस्येकरीता अधिकाऱ्यांना फोन करतात अधिकारी यांनी आपले फोन कृपया चालु ठेवावे.

**विशेष वसुली अधिकारी** :वसुलीसंदर्भांत मा.आयुक्त दर दोन दिवसाआड बैठक घेत असुन वसुली वाढविण्याच्या सूचना केल्या जात आहे. वार्ड अ मध्ये श्री.लाड, प्रभाग अधिकारी व श्रीमती प्रियंका केसरकर कार्यरत आहेत. 38 टक्के मालमत्ता व पाणीपट्टी 16 टक्के वसुली झालेली आहे. वार्ड ब मध्ये श्री.अझमत खान कार्यरत आहेत. 32 टक्के मालमत्ता व पाणीपट्टी 18 टक्के वार्ड क मध्ये प्रभाग अधिकारी श्री.सुर्यवंशी व श्रीमती शुभांगी आंधळे कार्यरत आहेत. 18 टक्के मालमत्ता व पाणीपट्टी 12 टक्के वार्ड ड मध्ये श्री.जरारे कार्यरत आहेत. 41 टक्के मालमत्ता व पाणीपट्टी 23 टक्के वार्ड ई मध्ये प्रभाग अधिकारी श्री.पैठणे व श्री.डाके कार्यरत आहेत. 27 टक्के मालमत्ता व पाणीपट्टी 12 टक्के वार्ड फ मध्ये श्री.राठोड कार्यरत आहेत. 49 टक्के मालमत्ता व पाणीपट्टी 16 टक्के वसुली झालेली आहे 100 कोटीचे टार्गेट दिलेले आहे 37 कोटी 53 लाख वसुल झालेली आहे. 37.5 टक्के वसुली झालेली आहे. 10 जप्ती दररोज प्रत्येक टिमने कराव्यात असे आदेश देण्यात आलेले आहे. साई संस्थेकडे 43 लाख मालमत्ता कर थकलेला आहे. 10 कोटी पाणीपट्टी थकलेली आहे. प्रशासनाने टाळे ठोकण्याची कारवाई करताच काही प्रमाणात कर भरणा केलेली आहे.

**श्री.समीर राजुरकर** :शैक्षणिक संस्थेला कुठला कर लावण्यात येतो.

**विशेष वसुली अधिकारी** : सेमी कमर्शिअल टॅक्स लावण्यात येतो.

**श्री.समीर राजुरकर** :अनुदानित व विनाअनुदानित संस्थेविषयी टॅक्स लावण्यासंदर्भांत निर्णय मा.सर्वसाधारण सभेमध्ये घेणे आवश्यक आहे. वसुली करण्यासंदर्भांत कुणाचाही विरोध नाही. मोठमोठे जे तंटे प्रलंबित आहे. त्या प्रकरणात मुळ रक्कम समोरच्याची जेवढी भरण्याची इच्छा असेल तेवढी रक्कम भरुन घ्यावी. तसेच चेक घेत असतांना त्या दिवशीचा किंवा एक ते दोन दिवसांचा अवधीचाच चेक स्विकारण्यात यावा. जेणे करून 20 मार्चच्या आत माहिती मिळेल किती चेक कॅश झालेले आहे. चेक बाऊंन्स होण्याचे प्रमाण कमी होईल.

**विशे्ष वसुली अधिकारी** :जे चेक बाऊंन्स झालेले आहे त्यांचेवर तात्काळ कारवाई केलेली आहे.

**मा.सभापती** :मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीची मोहिम 1 एप्रिल पासुन सुरू झाली पाहिजे व वर्षभर वसुली मोहिम राबविण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :31 मार्च नंतर टॅक्सचे प्रकरण निकाली काढुन मा.सर्वसाधारण सभेसमोर विषय आणुन प्रकरणाचा निपटारा झाला पाहिजे.

**श्री.नारायण कुचे** :अधिकाऱ्यांचे फोन चालू ठेवण्याबाबत सूचना करण्यात याव्या.

**विशेष वसुली अधिकारी** :फोन चालू ठेवण्याबाबत सूचना केलेल्या आहेत.

**श्री.समीर राजुरकर** :एलबीटी काही विशिष्ट बँकेमध्ये भरून घेतो याबाबतीत मालमत्ता व पाणीपट्टी भरण्याबाबत बँकेमध्ये सोय उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने विचार करावा.

**श्रीमती प्रियंका केसरकर**:बँकेमध्ये टॅक्स भरण्याबाबत नागरीकांना सुविधा उपलब्ध करून दिल्यास याबाबीचा रिझल्ट चांगल्या प्रमाणात प्राप्त होईल व अनेक प्रश्न निकाली लागतात.

**मा.सभापती** :मालमत्ता धारकांना कोड नंबर देण्यात येतो त्याचा वापर बँकेमध्ये टॅक्स भरण्याकरीता उपयोग होऊ शकतो. नविन टॅक्स लावण्याबाबत प्रशासन गंभिर नाही. 50 टक्के मालमत्तांना टॅक्स लावण्यात आलेला नाही. याबाबतीत प्रशासनाचे काय नियोजन आहे.

**सहा.आयुक्त (श्रीमती वसावा)** : नविन प्रॉपर्टी करामध्ये आणण्याकरीता वेगवेगळया दोन योजना राबविण्यात आल्या आहेत. जुलै 2011मध्ये स्वयंकर निर्धार योजना राबविण्यात आली परंतु या योजनेस योग्य प्रतिसाद मिळाला नाही. दिनांक 15.09.2012 ते 31.10.2012 नविन कर्मशियल प्रापर्टी ॲसेसमेंट करण्यात आले होते. 12055 नविन प्रॉपर्टीचे सर्वेक्षण करण्यात आले त्यातुन 3269 नविन प्रॉपर्टी शोधण्यात आल्या. त्यातुन 4 कोटी 26 लाख नविन टॅक्स जनरेट झालेला आहे. नविन टॅक्स लावण्यासंदर्भांत पुर्वी प्रभाग कार्यालयात टॅक्स लावण्यात येत होता सेंटरलाईस्झ्ड करण्यात आलेले आहे. नोव्हेंबर 2010 पासून मुख्यालयात टॅक्सचे ॲसेसमेंन्ट केले जाते.

**मा.सभापती** :जीटीएल व एलबीटी यांची यादी घेतली तरी नविन प्रॉपर्टी शोधता येईल.

**सहा.आयुक्त (श्रीमती वसावा )**:टॅक्स असेसमेंटकरीता कर्मचाऱ्यांची कमी संख्या आहे, आहे त्या मनुष्यबळाकडुन काम करुन घेतले जाते.

**श्री.समीर राजुरकर** :विभागात पुरेशे कर्मचारी देण्याबाबत विचार करण्यात यावे 1 एप्रिल पासून सक्षम टिम तयार केली पाहिजे.

**मा.सभापती** :महत्वाचा विभाग आहेत सदर विभाग सक्षम करणे आवश्यक आहे. शहर मोठया प्रमाणात वाढत आहे. परंतु नविन टॅक्स लावण्यात आलेले नाही. रजिष्ट्री ऑफिसमध्येच नविन अपार्टमेंट, फ्लॅट, बंगल्याची रजिष्ट्री करतांनाच महानगरपालिकेची टॅक्सची एनओसी मागण्यात यावी. परंतु ती अद्यापपर्यंत कार्यान्वित झालेली नाही. नविन प्रॉपर्टी ॲसेसमेंन्ट करणे, डिमांड वेळेवर जाणे गरजेचे आहे. एप्रिल मे जुन महिन्यात टॅक्स लागलेल्या प्रॉपर्टींना डिमांड जाणे गरजेचे आहे. याबाबत सर्वबाबींचे नियोजन प्रशासनाने करावे. वर्षातुन चार वेळेस वसुलीबाबतचे ड्राईव्ह घेतले पाहिजे. तसेच ज्या प्रभागात कमी वसुली होत आहे त्या प्रभागात ज्या प्रभागात वसुलीचे चांगले काम करणारे अधिकारी कर्मचारी यांची टिम कमी वसुली करणाऱ्या प्रभागात नेमण्यात यावे. जेणे करून त्या प्रभागाची वसुली वाढेल.

**विशेष वसुली अधिकारी :** ज्या वार्डात कमी वसुली आहे त्या वार्डात विशेष अधिकारी नेमण्यात आलेले आहे जेणे करून त्या प्रभागाची वसुली वाढेल हेच उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रबोधन प्रकाशन या संस्थेला नाथ सुपर मार्केट येथील दुकान क्र.1 भाडेतत्वावर दिलेली आहे. मालमत्ता विभागातर्फे सन 2003 ते 2011 पर्यंत भाडेवाढीचा फरक व व्याजापोटी एकूण रू.2,04,128/- अतिरिक्त रक्कम भरण्याबाबतचे पत्र दिलेले आहे. मालमत्ता विभागाने 8 वर्षे मागणी केली नाही. संस्थेतर्फे फरकाची व दंड व्याजाची रक्कम माफ करण्याची विनंती करण्यात आली आहे ती मान्य करावी. उर्वरीत रक्कम रू.4,17,218/- भरण्यास तयार आहेत ती रक्कम भरून घ्यावी.

**मा. सभापती :** सहा प्रभागापैकी काही प्रभागात कमी वसुली आहे. कमी वसुली असलेल्या प्रभागात योग्य नियोजन करण्यात यावे तसेच वसुली चागल्याप्रकारे केल्याबाबत अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात येते.

प्रबोधन प्रकाशन विश्वस्त संस्थेने केलेल्या विनंतीनुसार व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे एप्रिल 2003 ते मार्च 2011 या कालावधीतील भाडेवाढीचा फरक रू.1,53,348/- व दंड व्याज रू.50,780/- असे एकूण रू.2,04,128/- माफ करण्यात येते. उर्वरीत रक्कम रू.4,17,218/- भरून घ्यावेत. दंड व्याज व भाडेवाढीचा फरक माफ करण्याची संबंधीताची विनंती मान्य करण्यात येते. मालमत्ता विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद